# रितू छाब्रिया मुक्ताई पुरस्काराने सन्मानित

## सामाजिक आणि धार्मिक कार्याबद्दल गौरव

लोकशाही वार्ता/नागपूर

मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना त्यांनी केलेल्या सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते नुकतेच मुक्ताई पुरस्काराने गौरविण्यात आले. संस्थेच्या सदस्य मीना डिसा यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पुण्यातील शनिवारवाडा येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आदिशक्ती मुक्ताई स्मृतिगौरव व ज्ञानदा स्मृतिगौरव पुरस्कार सोहळ्यात विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्थेचे सोपानकाका वाल्हेकर महाराज, शिक्षणतज्ज्ञ देवीसिंग शेखावत, जळगाव येथील मुक्ताई संस्थानचे ॲड. रवींद्र पाटील उपस्थित होते.

मुंबईची आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था आणि श्रीसंत आदिशक्ती मुक्ताई विश्वकल्याण फाउंडेशनच्या वतीने सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित लोकांच्या कल्याणाकरिता निःस्वार्थीपणे योगदान देणाऱ्या संस्था व व्यक्तींना मुक्ताई पुरस्कार दिला जातो. शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या मुकुल माधव फाउंडेशनने अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या या विविध क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल मुकुल माधव फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना पुरस्कृत करण्यात आले.



माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते अध्यक्षा रितू छाब्रिया यांच्या वतीने मुक्ताई पुरस्कार स्वीकारताना मीना डिसा.

यावेळी आ. शोभा फडणवीस, दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, साईबाब ट्रस्ट प्रतिशिर्डी शिरगावचे अध्यक्ष प्रकाश देवळे, धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कृत करण्यात आले.

१९९९ मध्ये स्थापन झालेली मुकुल माधव संस्था दीनानाथ मंगेशकर, केईएम, रुबी हॉल अशा पुण्यातील रुग्णालयातील गरजू रुग्णांच्या उपचाराला विलंब होऊ नये तसेच उपचाराला खर्च देऊ न शकणाऱ्या रुग्णांच्या उपचाराची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहे. संस्थेने स्थापन केलेले मुकुल माधव विद्यालय ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना अत्यल्प खर्चात शिक्षण पुरवीत आहे.